राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या १५० व्या जयंती निमित्त स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत कार्यक्रम राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः स्वभामि-२०१८/प्र.क्र.५४९/पापु-१६.

७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक रोड, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
दिनांक: २२ जुलै, २०१९.

वाचा : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०१८/ प्र.क्र.५४९/पापु-१६, दिनांक ११/०७/२०१९.

शासन शुध्दीपत्रक:

उपरोक्त वाचा येथील शासन निर्णयातील तक्ता “अ” ऐवजी पुढील प्रमाणे तक्ता “अ” वाचण्यात यावा:-

तक्ता “अ”

दिनांक २ ऑक्टोबर २०२० पर्यंत पूर्ण करावयाची कामे

क्र	कार्यक्रमाचे स्वरुप	शासन आदेश/पत्र	कालमर्यादा
१	पायाभूत सर्वेक्षणातून सुटलेल्या सर्व कुटुंबांसाठी वैयक्तिक शौचालय बांधकाम करणे तसेच सर्वेक्षणातील व सर्वेक्षणातून सुटलेल्या सर्व लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान वितरीत करणे.	संदर्भाधीन क्रमांक ७ ते १४	दिनांक ३१/०७/२०१९ पर्यंत
२	एक खड्डा शौचालयाचे दोन खड्डा शौचालयामध्ये रुपांतर करणे.	संदर्भाधीन क्रमांक १ व ५	दर दिवशी प्रत्येक तालुक्यामध्ये किमान १५

क्र	कार्यक्रमाचे स्वरुप	शासन आदेश/पत्र	कालमर्यादा
३	सार्वजनिक/सामुहिक शौचालयांचे बांधकाम करणे.	संदर्भाधीन क्रमांक १५ व १६	दर महिन्याला प्रत्येक जिल्हयात किमान १५
४	मोठया कुटुंबांसाठी दोन शौचालये बांधणे- तालुक्यातील ज्या कुटुंबांमध्ये ८ पेक्षा जास्त व्यक्ती असतील अशा कुटुंबांना एक अतिरिक्त वैयक्तिक शौचालय बांधण्यास प्रवृत्त करणे.		दर महिन्याला प्रत्येक तालुक्यामध्ये किमान ४० कुटुंबाना अतिरिक्त वैयक्तिक शौचालय बांधण्यास प्रवृत्त करणे
५	i)शाश्वत स्वच्छता आराखडयातून सोनखत तयार झालेली शौचालये व वापरकर्ते कुटुंब यांचा शोध घेणे.		दिनांक ३१/०७/२०१९ पर्यंत
	ii) शौचालयाच्या खड्डयामधून सोनखत काढून खड्डा रिकामा करणे.		दर तीन महिन्यांमध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये किमान १खड्डा रिकामी करणे अनिवार्य आहे.
६	घनकचऱ्याचे जागेवर विलगीकरण करणे व व्यवस्थापन करणे.	संदर्भाधीन क्रमांक २ ते ६	दर महिन्याला प्रत्येक तालुक्यामध्ये किमान ८ गावांसाठी नियोजन करुन कार्यवाही करणे.
७	सांडपाण्याकरिता शोष खड्डे तयार करणे.	संदर्भाधीन क्रमांक २ ते ६	दर दिवशी प्रत्येक तालुक्यामध्ये उपलब्ध शासकीय योजनांच्या कृती संगम, लोक सहभाग अथवा निगमित (कंपनी) सामाजिक बांधिलकी (CSR Fund) यामधून उपलब्ध निधीतून किमान १०कुटुंबांसाठी नियोजन करुन कार्यवाही करणे.

क्र	कार्यक्रमाचे स्वरुप	शासन आदेश/पत्र	कालमर्यादा
८	गावातील सांडपाणी प्रक्रीया व पुर्नवापर.		कार्यक्रम कालावधीत प्रत्येक तालुक्यामधील किमान २ गावे निश्चित करुन त्या गावांमध्ये सांडपाणी प्रक्रीया व पुर्नवापर यासाठी कार्यवाही करण्यात यावी.
९	सफाई कामगारांच्या आरोग्याची काळजी घेणे.		दिनांक २ ते ९ ऑक्टोबर २०१९ या कालावधीतील कार्यक्रमा व्यतिरिक्त, जिल्हा आरोग्य केंद्राशी समन्वय साधून दर महिन्याला प्रत्येक तालुक्यातील किमान २० सफाई कामगारांसाठी मोफत आरोग्य चिकित्सा (तपासणी कार्यक्रम) आयोजित करणे

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२२१२१७०८९०२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Sachin Rane

Digitally signed by Smita Sachin Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f85d92aa99ea42eb86747707e3c3a129af986c1f95f6bc3e8165ceaf5155e6e7, serialNumber=4b9befd340493837db4cffafa6b96eeaf6aa3c12a7a6bf0467b0f517b724e8ee, cn=Smita Sachin Rane
Date: 2019.07.22 14:52:22 +05'30'

(स्मिता. स. राणे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.

३. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव.

४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

५. मा.विधानसभा व विधानपरिषद सदस्य.

६. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

७. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.

८. उपसचिव तथा प्रकल्प संचालक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई.

९. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष, सर्व.

१०.विभागीय आयुक्त, सर्व.

११.जिल्हाधिकारी, सर्व.

१२.महासंचालक ,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

१४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद सर्व.

१५.उपायुक्त (विकास), सर्व.

१६.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती/उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.

१७.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

१८.संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.

१९.निवडनस्ती, पापु-१६.